**ठळक बातम्या**

- आषाढी एकादशीनिमित्त पंढरपुरात वारकऱ्यांची अलोट गर्दी /मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शासकीय महापूजा

- सुना बेशा' उत्सवानिमित्त जगन्नाथ पुरीत लाखो भाविकांचा ओघ

- पोलीस, खाणकाम आणि तुरुंग विभागातल्या काही पदांवर थेट भर्तीत अग्निवीरांना १० टक्के समांतर आरक्षण देण्याची हरयाणा सरकारची घोषणा

- कोकण, गोवा, कर्नाटकचा दक्षिण भाग, सौराष्ट्र, कच्छ, आणि कर्नाटकच्या किनारपट्टी भागात पुढच्या ३ दिवसात मुसळधार पावसाची शक्यता

**आणि**

- पॅरिस ऑलिंपिकसाठी भारतीय संघाच्या यादीवर केंद्रीय क्रीडा मंत्रालयाचं शिक्कामोर्तब

**<><><><><>**

आषाढी एकादशी आज राज्यात भक्तिभावानं साजरी झाली. वारीसाठी पंढरपूर इथं वारकऱ्यांची अलोट गर्दी झाली होती. श्री विठ्ठल मंदिरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शासकीय महापूजा सपत्नीक केली. मानाचे वारकरी प्रतिनिधी म्हणून नाशिक जिल्ह्यातल्या बाळू अहिरे आणि त्यांच्या पत्नी आशा यांना महापूजेचा मान मिळाला. यंदा राज्यभरात पाऊस चांगला झाला असून खरीपाची विक्रमी पेरणी झाली आहे, असं सांगत सर्वांना सुख, समृद्धी दे असं साकडं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विठ्ठलाला घातलं.

सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, तसंच राधकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, डॉ. तानाजी सावंत, दीपक केसरकर, हे मंत्रीही यावेळी उपस्थित होते.

यावेळी मानाच्या पालख्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आलं.

पंढरपूर इथं राजर्षी छत्रपती शाहू महाराज सांस्कृतिक भवनाचं भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केलं. विठ्ठल मंदिर संवर्धनासाठी ७३ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून पंढरपूर तीर्थक्षेत्र आराखडा पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. शाहू महाराज सांस्कृतिक भवनासाठी पाच कोटी रुपये निधी मंजूर केला असून त्यात आणखी १० कोटींची भर घातली जाणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आषाढी एकादशी निमित्त सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या. विठ्ठलाचा आशीर्वाद सर्वांवर सदैव राहो तसंच आनंद आणि समृद्धीनं भरलेला समाज निर्माण होवो, असं समाज माध्यमावर सामायिक केलेल्या संदेशात त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

'सुना बेशा' या सुवर्ण पेहरावातले भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक ओदिशात पुरी इथं लोटले आहेत. सुना बेशा हा उत्सव, सुवर्णालंकारांच्या प्रदर्शनासह ओदिशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशावर प्रकाश टाकणारा महत्त्वपूर्ण आध्यात्मिक उत्सव आहे. या तिघांचेही तीन स्वतंत्र रथ, २०८ किलोग्रॅम सोन्याच्या दागिन्यांनी मढवलेले आहेत. त्यांची मावशी

गुंडीचा देवी यांच्या घरचा ८ दिवसांचा पाहुणचार आटोपून. गुंडीचा मंदिरातून परतल्यानंतर, १२ व्या शतकातल्या श्री जगन्नाथ मंदिराच्या सिंहद्वारा समोर हे रथ उभे केले जातात. 'सुना बेशा' साठी पुरीत कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

**<><><><><>**

आशुरा-ए-मुहर्रम आज देशाच्या विविध भागांमध्ये मोठ्या श्रद्धेनं आणि भक्तीभावानं पाळला जात आहे. या दिवशी प्रेषित मोहम्मद यांचे नातू हजरत इमाम हुसेन आणि त्यांच्या साथीदारांनी, सत्य, सत्व आणि न्याय या तत्वांसाठी करबलामध्ये हौतात्म्य पत्करलं होतं. त्या स्मृतीप्रीत्यर्थ हा दिवस पाळला जातो.

**<><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमधून ४ नेते आणि २४ पदाधिकारी आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात सामील झाले. बारामती इथं एका कार्यक्रमात, अजित गव्हाणे, आज़म पानसरे, माजी आमदार विलास लांडे आणि इतर नेते-कार्यकर्त्यांनी शरद पवार यांच्या उपस्थितीत पक्षात प्रवेश केला. यातले २४ जण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतले माजी नगरसेवक आहेत.

**<><><><><>**

राज्यात शांतता नांदावी यादृष्टीनं, मराठा - ओबीसी वादावर तोडगा काढण्यासाठी आपण प्रयत्न करू असं ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी सांगितलं आहे. ते आज पुण्यात आयोजित वार्ताहर परिषदेत बोलत होते. या समुदायांमधला वाद मिटवण्यासाठी पुढाकार घेण्याची विनंती, मंत्री छगन भुजबळ यांनी शरद पवार यांना भेटून केली, त्या पार्श्वभूमीवर पवार बोलत होते.

हा वाद निर्माण होण्यासाठी सत्ताधारीच जबाबदार असल्याचा आरोप पवार यांनी केला. मराठा समुदायाचे मनोज जरांगे आणि ओबीसी समाजातर्फे आंदोलन करणारे लक्ष्मण हाके यांच्याशी सरकारच्या प्रतिनिधींची चर्चा झाली असून आपल्याला त्याचा तपशील माहीत नाही, असं ते म्हणाले. त्याच कारणानं, आरक्षणासंबंधी सरकारनं बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला आपण गेलो नव्हतो असं त्यांनी स्पष्ट केलं.  या चर्चेचा तपशील समजला तर परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी काही प्रयत्न करता येईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

पोलीस, खाणकाम आणि तुरुंग विभागातल्या काही पदांवर थेट भर्ती करताना, हरयाणा सरकार अग्निवीरांना १० टक्के समांतर आरक्षण देणार आहे. मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांनी आज चंदीगढ इथे वार्ताहरांशी बोलताना ही घोषणा केली. हरयाणातल्या पोलिस हवालदार, खाण रक्षक, वनरक्षक, कारागृह अधीक्षक आणि विशेष पोलिस अधिकारी, या पदांचा यात समावेश आहे, असं ते म्हणाले.

ड गटात भर्ती करताना, अग्निवीरांना वयात ३  वर्षांची सवलत दिली जाईल आणि पहिल्या तुकडीसाठी ही सवलत पाच वर्षांची असेल, असंही त्यांनी सांगितलं. अग्निवीरांना गट क मध्ये पाच टक्के, आणि ब गटात एक टक्के आरक्षणही, त्यांनी जाहीर केलं.

कोणत्याही औद्योगिक कारखान्यानं अग्निवीरांना दरमहा ३० हजार रुपयांपेक्षा जास्त पगार दिला, तर सरकार त्या कारखान्याला वार्षिक ६० हजार रुपये अनुदान देईल, याशिवाय कोणत्याही अग्निवीरानं स्वत:चा उद्योग उभारला तर त्याला ५ लाख रुपयांपर्यंत बिनव्याजी कर्ज दिलं जाईल, अग्निवीरांना प्राधान्यानं शस्त्र परवाना दिला जाईल, असंही सैनी यांनी जाहीर केलं.

**<><><><><>**

भारतीय हवामान विभागानं कर्नाटकच्या दक्षिण भागात, सौराष्ट्र आणि कच्छ, कोकण, गोवा आणि कर्नाटकच्या किनारपट्टी भागात पुढील ३ दिवसात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. पुढील चार ते पांच दिवसात मध्य भारतात मान्सून सक्रिय होण्याची शक्यता आहे. पूर्व आणि ईशान्य भारतात १९ आणि २० जुलै रोजी अतिवृष्टीचा अंदाज आहे. पश्चिम बंगाल, नागालँड, मणीपुर, मिझोरम आणि त्रिपुरा मध्ये १९ ते २१ जुलै रोजी अतिमुसळधार पावसाचा अंदाज आहे. उत्तराखंड आणि पूर्व राजस्थानात पुढील ५ दिवस अति मुसळधार पाऊस पडेल. पंजाब आणि राजस्थानाच्या पश्चिम भागात उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिंपिकसाठी भारतीय संघाच्या यादीवर केंद्रीय क्रीडा मंत्रालयानं शिक्कामोर्तब केलं आहे. संघात ११७ खेळाडूंचा समावेश असून सोबत १४० तज्ज्ञ, अधिकारी आणि कर्मचारी असतील. एथलेटिक्स प्रकारात सर्वाधिक २९ खेळाडूंची निवड झाली असून नेमबाजीसाठी २१ जण भाग घेणार आहेत. हॉकीसाठी १९, टेबल टेनिसकरता आठ आणि बॅडमिंटनसाठी सात खेळाडू भारताचं प्रतिनिधित्व करतील. मुष्टियुद्ध आणि तिरंदाजीसाठी प्रत्येकी ६, गोल्फ साठी ४ तर टेनिसकरता ३ खेळाडूंचा समावेश संघात केला आहे. याखेरीज जलतरण, नौकानयन, भारोत्तोलन, ज्युदो इत्यादी क्रीडाप्रकारांमधे भारतीय खेळाडू भाग घेणार आहेत.

पॅरिस ऑलिंपिक क्रीडास्पर्धा येत्या २६ जुलैपासून सुरु होणार असून त्या ११ ऑगस्टपर्यंत चालतील.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात सुरजागड इस्पात प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या पोलाद प्रकल्पाचं भूमिपूजन आज उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि अजित पवार यांच्या हस्ते गडचिरोली इथं झालं. अहेरी तालुक्यात वडलापेठ इथं साडेतीनशे एकर जागेवर १० हजार कोटी रुपयांचा हा पोलाद प्रकल्प उभा राहाणार आहे.

लाडकी बहीण योजनेचा पहिला हफ्ता पुढच्या महिन्यात रक्षाबंधनाच्या वेळी जारी केला जाईल, असं फडनवीस यांनी या कार्यक्रमानंतर बातमीदारांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

मॉरिशसच्या दौऱ्यावर असलेल्या परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी आज मॉरिशसचे माजी प्रधानमंत्री डॉ. नवीन रामगुलाम आणि पॉल बेरेंजर यांची भेट घेतली. या भेटीत दोन्ही देशांच्या भागीदारीवर तसंच समकालीन प्रश्नांवर चर्चा झाल्याचं जयशंकर यांनी त्यांच्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. यावेळी डॉ. जयशंकर यांनी मॉरिशसचे विरोधी पक्षनेते डॉ.अरविन बुलेल यांचीही भेट घेतली. यावेळी त्यांच्यात भारत-मॉरिशस संबंध आणि हिंदी महासागरीय क्षेत्राच्या विकासाच्या मुद्द्यावर चर्चा झाली.

**<><><><><>**

रेल्वे संरक्षण दलानं नंन्हे फरिश्ते या मोहिमे अंतर्गत गेल्या ७ वर्षात ८४ हजारांहून अधिक मुलांची सुटका केल्याची माहिती रेल्वे मंत्रालयानं दिली आहे. पळून गेलेली, बेपता, अपहरण केलेली आणि मतिमंद मुलांची सुटका या मोहिमे अंतर्गत झाली आहे. नंन्हे फरिश्ते ही केवळ एक मोहीम नसून कठीण परिस्थितीत अडकलेल्या हजारो मुलांची जीवनरेखा आहे, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

आरोग्यमंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आज दिल्लीत केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटनेच्या अधिकाऱ्यांसोबत एक आढावा बैठक घेतली. आरोग्य विभागाचे सचिव अपूर्व चंद्रा आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. केंद्रीय औषध मानक नियंत्रण संघटना देशात औषधं, वैद्यकीय उपकरणं आणि सौंदर्य प्रसाधनांची गुणवत्ता आणि सुरक्षितता नियंत्रित करण्याचं कामं करते.

**<><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात पोलीस माओवाद्यांमध्ये आज झालेल्या चकमकीत एक पोलीस उपनिरीक्षक जखमी झाल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

जारावंडी पोलीस ठाण्याअंतर्गत छिंदभट्टी आणि पीव्ही 82 दरम्यान आज दुपारी ही चकमक झाली. चकमकीत जखमी झालेल्या उपनिरीक्षक सतीश पाटील यांना हेलिकॉप्टरनं गडचिरोलीला हलवलं आहे. या चकमकीत काही नक्षलवादीही जखमी झाल्याचं समजतं.

**//<><><><><>//**